# भगवान रामकृष्ण परमहंसदेव यांचे संक्षिप्त जीवनचरित्र


## लेखक – सदाशिव भगवंत ठोंबरे, एम्. ए.



## रामकृष्ण धंतोली, नागपूर

## सन १९३६


।।ॐ।।

''श्रीरामकृष्ण हे देवत्वाची सजीव मूर्तीच होत. त्यांच्या उक्ती म्हणजे पढीक पंडितांची कोरडी वचने नव्हत; तर ती त्यांच्या जीवनग्रंथातील पृष्ठे होत. त्यांत त्यांचे स्वत:चे अनुभवच प्रगट झालेले आहेत व म्हणूनच त्यांचा वाचकाच्या मनावर अचूक परिणाम झाल्याखेरीज राहत नाही. ह्या संदेहवादी युगात ज्यांना एरव्ही आत्मज्योतीच्या प्रकाशाला मुकल्यामुळे अंधकारात चाचपडत राहावे लागले असते अशा हजारो स्त्रीपुरुषांना रामकृष्ण म्हणजे तेजोमय व प्रत्यक्ष धर्माचे जिवंत उदाहरणच होय.''

- महात्मा गांधी

========

# प्रकाशकाचे निवेदन

मराठी भाषेमध्ये भगवान श्रीरामकृष्णांचे एक छोटेस चरित्र असावे, की जे वाचले असता त्यांच्या जीवनाचे सारसर्वस्व थोडक्यात पण यर्थाथतेने समजेल. अशा पुस्तकाची बरीच उणीव भासत होती. ईश्वरकृपेने प्रस्तुत चरित्राच्या प्रकाशनाने ती उणीव सर्वस्वी भरून निघाली आहे. ह्या चरित्राच्या लेखकाला पूज्यपाद स्वामी अखंडानन्दजी महाराजांच्या निकट सहवासाचा लाभ काही काल लाभला आहे. श्रीमत् स्वामी अखंडानन्दजी महाराज हे श्रीरामकृष्णांच्या अंतरंग लीलासहचारांपैकी एक असून स्वामी विवेकानन्दांनी स्थापन केलेल्या श्रीरामकृष्ण मिशनचे ते विद्यमान अध्यक्ष आहेत. त्यांच्या पवित्र सहवासाने, मिळालेल्या स्फूर्तीने व इतर अधिकृत ग्रंथांच्या परिशीलनाने मिळविलेल्या माहितीवरून प्रस्तुत लेखकाने श्रीरामकृष्णांच्या जीवनातील अनेक ठळक व महत्वाच्या गोष्टींचे युक्तिपुरस्सर व चातुर्याने यथार्थ दिग्दर्शन केले आहे. या चरित्राची किंमतही फारच माफक ठेविली आहे.

हे पुस्तक मराठी वाचक बंधुभगिनीस फार आवडेल असा आमचा भरवसा आहे.

**स्वामी भास्करेश्वरानंद**,

अध्यक्ष- श्रीरामकृष्ण आश्रम धंतोली, नागपूर

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | उपोद्घात | १ |
| २. | बालपणची हकीकत | २ |
| ३. | दक्षिणेश्वरी आगमन | ६ |
| ४. | साधना | १२ |
| ५. | श्रीरामकृष्ण विवेकानंद | २७ |
| ६. | अखेरचे दिवस आणि महासमाधी | ३० |




**‘जो राम आणि कृष्ण (झाला होता);**

**तोच आता रामकृष्ण ! (होऊन आला आहे).**

**--श्रीविवेकानंद–**

**========**

।।ॐ नमो श्रीभगवते रामकृष्णाय ।।

# श्रीरामकृष्ण परमहंस देव यांचे जीवनचरित्र

## १–उपोद्घात

**सांप्रतची धर्मग्लानी व श्रीरामकृष्णांचा अवतार:-** ईश्वराचा अवतार होतो ती वेळ धर्मग्लानीची असते. आज श्रीरामकृष्णांना जन्मून शंभर वर्षे झाली. त्यांच्या जन्मकाळी हिंदुस्थानची स्थिती कशी होती? इंग्रजी राज्य स्थिर होऊन पाश्चात्त्य कल्पनांचा पगडा हळू हळू लोकांच्या मनावर बसत चाललेला होता. सनातन धर्माविषयी लोकांचे ग्रह पूर्वीप्रमाणे राहिले नव्हते; व वैदिक धर्मावरील लोकांचा विश्वास उडत चाललेला होता. मूर्तिपूजा आवडत नसल्यामुळे, ह्या काळीच ब्राह्मसमाजासारख्या नवीन संप्रदायाची स्थापना झाली. उच्च विद्यालयातून आधुनिक पद्धतीचे शिक्षण मिळत असल्यामुळे, तरुण विद्यार्थ्यांची मने जास्त चिकित्सक, संशयखोर व काही अंशी नास्तिकसुद्धा बनली. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे त्या काळी लोकांना आपल्या धर्माचे खरे स्वरूप कळले नाही आणि म्हणूनच ते सहज रीतीने नवीन विचारांच्या आहारी पडले. अशा ऐन धर्मग्लानीच्या वेळी त्यांना योग्य मार्गदर्शनाची जरूरी होती व हे कार्य श्रीरामकृष्णांनी अवतार घेऊन पार पाडलें.

## २–बालपणची हकीकत

**श्रीरामकृष्णांचा जन्म:-** साधारणत: आपणाला असे दिसून येते की जगाला नवीन शिकवणूक देणाऱ्यांचा जन्म दारिद्र्यावस्थेतच झालेला असतो. भगवान श्रीकृष्ण, येशू ख्रिस्त, शंकराचार्य, श्रीकृष्ण चैतन्य आणि श्रीमहमद ह्या महापुरुषांचे जन्म गरीब कुटुंबातच झाले. ह्यांच्या संबंधी असाच ईश्वरी संकेत दिसतो की त्यांनी आपल्या आयुष्याचा प्रथम भाग आपत्तींनी पीडिलेल्या लोकांमध्ये घालवावा. गरिबांच्या सहवासात राहिल्यामुळे त्या सर्वांना दु:खमय जगाची चांगलीच कल्पना आली आणि साहजिकच त्यांचे मन जगाला नवीन दृष्टी देण्याकडे वळले.

श्रीरामकृष्णांचे तसेच झाले. त्यांचे वडील श्रीयुत क्षुदिराम चतर्जी हे मध्यम स्थितीतले निष्ठावान आणि सदाचारसंपन्न असे ब्राह्मण होते. देरे (हे गाव बंगाल प्रांतात, हुगळी जिल्ह्यात आहे.) हे त्यांचे मूळ गांव व श्रीरामचंद्र हे त्यांचे वंशपरंपरागत उपास्य दैवत. सत्यनिष्ठा, त्याग, संतोष, वगैरे जे गुण ब्राह्मणाच्या अंगी स्वभावसिद्ध असावे, ते गुण त्यांचे ठिकाणी पूर्णपणे वसत होते; आणि म्हणूनच गावातील सर्व लोक त्यांना ऋषीप्रमाणे मान देत. वयाच्या ३९ व्या वर्षी त्यांच्यावर भयंकर संकट गुदरले. देरे गावच्या जमीनदाराच्या बाजूने खोटी साक्ष न दिल्यामुळे त्यांच्यावर काहीतरी कुभांड रचले गेले व शेवटी त्यांची वडिलोपार्जित मालमत्ता जप्त झाली. अशा रीतीने क्षुदिरामांना अत्यंत दरिद्री अवस्था एकाएकी प्राप्त झाली. दुर्जनापासुन चार हात दूरच राहावे ह्या हेतूने त्यांनी आपले गाव सोडले व ते कामारपुकूर (हे गाव बंगाल प्रांतात, हुगळी जिल्ह्यात आहे.) नावाच्या जवळच्या गावी राहावयास गेले.

क्षुदिरामांची द्वितीय पत्नी श्रीमती चंद्रादेवी ही स्नेह व सरलता यांची मूर्तिमंत पुतळीच होती. अलौकिक दया व गरिबांवर प्रेम हे दोन गुण तिच्या ठायी पूर्णपणे वास करीत असत. दरिद्री, साधू, संन्यासी, फकीर यांना माहीत असे की चंद्रादेवीचे दार त्यांच्यासाठी सदैव खुले राहते. लहान मुलांची तिला अतीच आवड असे. तिचे हृदय भूतमात्रांच्या प्रेमाने भरून गेले होते. स्वत:च्या संसारापेक्षा तिला जवळपासच्या गरीब लोकांच्या संसाराचीच जास्त काळजी वाटावी. तिच्या ठायी वात्सल्य भाव उत्कटतेने प्रगट झाला होता. अशा प्रकारे उच्च प्रकृतिसंपन्न व उदार चरित्रवान असे ते जोडपे गावातील लहान थोर मंडळीस अत्यंत पूज्य व वंदनीय होऊन बसले होते.

जगदुद्धारक व्यक्तींचा जन्म होण्यापूर्वी त्यांच्या मातापितरांना असाधारण आध्यात्मिक अनुभव येतात व त्यांना दिव्य दर्शनाचाही लाभ होतो. श्रीरामकृष्णांच्या मातापितरांचेही असेच झाले. क्षुदिराम गयेस पिंडदान करण्याकरिता गेले असता त्यांना स्वप्न पडले व त्यात भगवान श्रीगदाधर श्यामसुंदर दिव्य असे रूप धारण करून, स्नेहमय दृष्टीने आपल्यास जवळ बोलवीत आहे असे त्यांना दिसले. ते दृश्य पाहून क्षुदिरामांचे अत:करण भक्तीने भरून जाऊन ते त्यांची स्तुती करू लागले. इतक्यात भगवंतांनी मधुरवाणीने त्यांना आशीर्वाद देऊन सांगितले,"मी धर्मग्लानी झाली असता धर्मस्थापनेकरिता अवतार घेत असतो. ह्या वेळी

पुत्ररूपाने तुझ्या घरी अवतीर्ण होऊन तुझी सेवा ग्रहण करीन.''

त्याचवेळी इकडे कामारपुकूरास क्षुदिरामांची पत्नी चंद्रादेवी आपल्या घरासमोरच्या शिवमंदिरापुढे उभी होती. तितक्यात तिला असे दिसले की महादेवाच्या अंगातून एक दिव्य ज्योती बाहेर पडून तिने सर्व मंदिर व्यापिले आहे व ती वायुप्रमाणे तरंगाकार होऊन तिच्याकडे वेगाने येत आहे. आश्चर्याने चकित होऊन शेजारणीला ते दृश्य दाखविते न दाखविते तोच ती ज्योती तिच्या शरीरात शिरली व ती संज्ञाशून्य होऊन खाली पडली. त्या दिवसापासूनच तिला गर्भ राहिला व उचित समय येताच वयाच्या ४५ व्या वर्षी शके १७५७ फाल्गुन शुद्ध द्वितीया, बुधवार, सन १८३६, १७ फेब्रुवारी रोजी ब्राह्ममुहूर्ती तिला पुत्ररत्न झाले. तेच आपले श्रीरामकृष्ण परमहंस होत. श्रीगदाधरांच्या कृपेने पुत्र झाला म्हणून क्षुदिरामांनी बालकाचे नाव गदाधर असे ठेविले.

**बालपण व उच्चावस्था:-** लहानपणापासूनच श्रीरामकृष्णांचे आचार, विचार, मानसिक संस्कार, ईश्वरभक्ती व धर्मपरायणता ही अलौकिक अशीच होती. किशोरावस्थेत असतानाच त्यांना भावसमाधी लागे व दिव्य दर्शने प्राप्त होत. अवतारी पुरुषांमध्ये हाच तर विशेष गुण आढळून येतो. त्यांचे दैवी स्वरूप बालपणापासूनच प्रकट होण्यास सुरुवात होते.

एक दिवस शेतामध्ये उभे असता त्यांना काळ्याकुट्ट ढगाच्या पार्श्वभूमीवर पांढरेशुभ्र बगळे उडत असताना दिसले. त्या अपूर्व देखाव्यामुळे त्यांचे देहभान हरपले व त्यांना समाधी प्राप्त झाली. त्यांच्या आयुष्यातला हा पहिलाच उच्च अनुभव होय. (असे म्हणतात की वर्डस्वर्थ कवीला सुद्धा निसर्गाचे रमणीय स्वरूप पाहून भावसमाधी लागत असे.) पुढे पुढे तर भावसमाधीचे हे असले प्रसंग वरचेवर घडून येत. देवाचे गाणे म्हणत असता अथवा त्यांची कथा वाचीत असता ते कित्येकदा तल्लीन होऊन समाधिमग्न होत. **''लहाणपणी जेव्हा बुद्धीला फाटे फुटलेले नसतात तेव्हा मन ईश्वराकडे सहज लागते. मोठेपणी फाटे फुटल्यावर ते ईश्वराकडे लागता लागत नाही.''** हे त्यांचे शब्द लक्षात ठेवण्याजोगे आहेत.

**श्रीरामकृष्णांचे कलकत्त्यास आगमन:-** वयाच्या सातव्या वर्षी श्रीरामकृष्णांवर, गरीब कुटुंबावर येऊ नये असा अत्यंत शोकजनक प्रसंग गुदरला. वयाच्या ६८ व्या वर्षी क्षुदिराम, आपल्या भाच्याच्या गावी दुर्गापूजेच्या उत्सवासाठी गेले असता, तेथेच त्यांना देवाज्ञा झाली. ही दु:खद वार्ता कामारपुकुरास पोहोचली व चंद्रादेवीवर आकाश कोसळले. श्रीरामकृष्णांना त्या वयात सुद्धा आपल्या वडिलांच्या मृत्युमुळे उदास वाटू लागले व दिवसातील काही वेळ ते एकान्तात विचार करण्यामध्ये घालवू लागले. लहान होते तरी त्यांना समजत असे की आपण आईला गृहकृत्यात मदत करावी व तिचा दु:खभार कोणत्याही रीतीने हलका करावा.

आपल्या प्रेमळ आचरणामुळे ते त्यांच्या खेड्यात लहानापासून मोठ्यापर्यंत सर्वांनाच आवडत. विशेषत: स्त्रीवर्गाचे त्यांच्यावर विशेष प्रेम असे. त्यांचा आवाज गोड असल्यामुळें व तन्मयतेने पदें म्हणता येत असल्यामुळे प्रत्येकाला ते हवेसे वाटत. प्रथमपासूनच शाळेतले अर्थकारी शिक्षण घेण्याकडे त्यांचा ओढा नसे. त्यांना पूजा व ध्यान ह्यांतच निमग्न रहाणे अधिक आवडे. वयाच्या अकराव्या वर्षीच त्यांना आपण ईश्वराचे अवतार आहोत व धर्मस्थापनेच्या कार्यासाठीच आपला जन्म आहे, अशी स्पष्ट जाणीव झाली होती, आणि म्हणूनच लहानपणापासून त्यांचे अंगी दिव्य गुण वसत होते.

त्याकाळी त्यांना साधुजनांमध्यें मिळून मिसळून वागण्याची सवय होती व ते साधू देखील त्यांच्यावर प्रेम करीत व त्यांना उपदेशामृत पाजीत. विरक्त पुरुषांच्या जीवनचरित्राचें चित्र त्यांच्या अंतश्चक्षूपुढे नेहेमी उभे राहिल्यामुळें त्याचे मन त्यागाच्या मार्गाकडे ओढले जाई; पण लगेच त्यांना आपल्या गरीब मातेची व भावांची आठवण होई व त्यांना मदत करण्याचे विचार त्यांचे मनात येत. अशा रीतीने दोन विरुद्ध जातीच्या विचारांचा झगडा त्यांच्या ह्रदयात त्या काळापासूनच सुरू झाला.

जेव्हा त्यांच्या वडील भावाने पाहिले की खेड्यामध्ये श्रीरामकृष्णांचे शिक्षणाकडे लक्ष लागत नाही, तेव्हा त्याने त्यांना आपल्याबरोबर कलकत्त्यास आणले. गोकुळ सोडताना गोप-गोपींना जसे दु:ख झाले तसेच दु:ख श्रीरामकृष्णांनी कामारपुकूर सोडलें तेव्हा तेथील लोकांना झाले. ह्यावरून त्यांच्या प्रेमळ स्वभावाची आपणाला काही कल्पना करीता येते.

## ३–दक्षिणेश्वरी आगमन

**राणी रासमणी आणि दक्षिणेश्वरचे देऊळ:-** दक्षिणेश्वर हे स्थान कलकत्त्याजवळ असून येथेच श्रीरामकृष्णांच्या पुढील आयुष्यातील काळ गेला. म्हणून ह्या ठिकाणाची माहिती असणे आपणास आवश्यक

आहे.

राणी रासमणीचे नाव त्यावेळी फार प्रसिद्ध होते. तीच पतिनिधनानंतर अलोट संपत्तीची मालकीण झाली आणि त्या संपत्तीचा विनियोग तिने योग्य प्रकारेच केला. प्रेमळ हृदय, गरिबांबद्दल अनुकंपा आणि ईश्वर व धर्म ह्यांवरील दृढ श्रद्धा हे तिचे मुख्य गुण होते. राणीला मथुरनाथ विश्वास नावाचे जावई होते. इस्टेटीच्या कामावर देखरेख करण्यात ह्यांची तिला फार मदत होई. हेच मथुरबाबू पुढे श्रीरामकृष्णांच्या साधनकाळी त्यांच्या फार उपयोगी पडले. त्यांची श्रीरामकृष्णांवर गुरूप्रमाणे भक्ती असे व ते त्यांना वडिलाप्रमाणे मान देत.

एक दिवस राणीला काशीयात्रेस जाण्याची इच्छा झाली व त्याप्रमाणे तिनें निघण्याची तयारी सुद्धा केली पण निघण्याच्या दिवशी रात्री तिला स्वप्नामध्यें कालीदेवी दिसली. देवीने तिला काशीला जाण्याचा बेत रहित करण्यास सांगितले, व असा आदेश दिला की, राणीने गंगेच्या काठावर देवीचे मंदिर बांधावे. देवीने असेही सांगितले की, त्या मंदिरातील मूर्तीमध्ये तिचा प्रत्यक्ष वास राहील. ते स्वप्न पाहून राणीला फार आनंद झाला. तिनें काशीयात्रेचा विचार सोडून दिला व दक्षिणेश्वरला विस्तृत जागा खरेदी करून देऊळ बांधण्यास सुरुवात केली. हेच ते दक्षिणेश्वरचे सुप्रसिद्ध काली मंदिर.

देऊळ बांधल्यानंतर राणीच्या मार्गात एक नवीनच अडचण उत्पन्न झाली. जातीने शूद्र (कोळी) असल्यामुळे ब्राह्मणवर्ग देवळात येईना व देवीच्या पूजेअर्चेकरिता पुजारी देखील मिळेना. शेवटी श्रीरामकृष्णांच्या वडील भावानें— रामकुमारने एक तोड काढली. त्याने राणीस सुचविले की जर तिने एखाद्या ब्राह्मणाच्या नावाने देवळाचे देणगीपत्र लिहून दिले तर ते देऊळ ब्राह्मणाच्या मालकीचे होईल व पूजाअर्चा सुरळीत चालेल. राणीला ही कल्पना पसंत पडली व तिने त्याप्रमाणे केले. अशा रीतीने तिची एक मोठीच काळजी नाहीशी झाली. पुढे पुजारीपदाकरिता तिला योग्य मनुष्य मिळेना, कारण ब्राह्मणांना शूद्राची चाकरी करणे त्यावेळी आवडले नाही. पण ही अडचण सुद्धा रामकुमारने स्वत: पुजारीपद स्वीकारून दूर केली.

रामकुमार जेव्हा देवळात राहावयास आले, तेव्हा त्यांचेबरोबर श्रीरामकृष्णही तिथे आले. त्यांचें आकर्षक स्वरूप, सात्त्विक आचरण व ध्यानामध्ये ताबडतोब मग्न होऊन जाण्याची प्रवृती पाहून मथूरबाबूंचे मन त्यांचेकडे ओढले गेले. पुढें त्यांच्याच आग्रहावरून श्रीरामकृष्णांनी आपल्या वडील भावाच्या मृत्यूनतंर श्रीकालीदेवीचे पुजारीपण स्वीकारले.

**प्रथम दर्शन:-** श्रीकालीदेवीच्या पूजेचे काम मिळाल्यानंतर श्रीरामकृष्णांच्या अंत:करणात देवीच्या दर्शनाची विलक्षण तळमळ उत्पन्न झाली. मंदिराजवळच एक निबिड अरण्य होते. त्या अरण्यात अगदी एकीकडे ते रात्रीच्या रात्री देवीचे चिंतन करण्यात घालवीत. शरीराकडे त्यांचे लक्षच नव्हते. एका देवीवाचून त्यांना दुसरे काही एक सुचेनासे झाले. जेव्हा दिवस मावळे व संध्याकाळच्या आरतीच्या वेळेस देवळातील घंटा वाजत, तेव्हा टाहो फोडून अश्रुपूर्ण नयनांनी ते म्हणत, ''आई आजचाही दिवस तुला पाहण्यावाचूनच गेला. आई! माझ्या अल्प आयुष्याचा एक एक दिवस व्यर्थ निघून जात आहे, पण अद्याप तुझे दर्शन का बरे होत नाही?'' त्यांच्या हृदयाची तळमळ इतकी तीव्र होत असे की ते मातीत तोंड घासीत व व्याकुळ अत:करणाने एखाद्या लहान मुलाप्रमाणे रडत.

ह्या दिवसांची आठवण झाली म्हणजे श्रीरामकृष्ण म्हणत, ''आईचे दर्शन न झाल्यामुळे मनाला होणाऱ्या वेदनांची तुम्हाला कल्पना देखील करता येणार नाही. मला असे वाटे की जसा आपण आंग पुसण्याचा ओला रुमाल पिळतो ना, तसेच कुणीतरी माझे हृदय पिळून काढीत आहे. आईच्या वियोगाचे दु:ख मला सहन करवेना. शेवटी मला असे वाटले की ह्या आयुष्यात काही तिचे दर्शन होत नाही, मग जिवंत राहून तरी काय उपयोग? लगेच तिथे ठेवलेली तलवार माझ्या दृष्टीस पडली स्वत:स मारण्याकरिता आवेशाने मी ती उचलणार तोच आईने मला अद्भुत दर्शन दिले.'' त्यावेळच्या अनुभवाचे श्रीरामकृष्णांनी पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे. ''सर्व दृश्य वस्तू माझ्या नजरेसमोरून पार नाहीशा झाल्या व एक असीम, अनंत, सचेतन असा ज्योति:समुद्र सर्वबाजूला दिसू लागला. त्याच्या लाटांनी चोहोकडून मला घेरले व कोठच्या कोठे बुडवून टाकले. मग मी संज्ञाशून्य होऊन खाली पडलो.''

ह्यानंतर आईचे दर्शन त्यांना वारंवार होत असे. जसे आपण घरी आपल्या आईशी बोलतो तसेच श्रीरामकृष्ण श्रीकालीमातेशी बोलत असत व देवी सुद्धा त्यांच्याशी हसून खेळून त्यांना नवीन नवीन गोष्टी शिकवी. ह्या दर्शनासंबंधी श्रीरामकृष्ण म्हणत,''देवीच्या प्रत्यक्ष श्वासाचा माझ्या हातांना स्पर्श होत असे.''

आईच्या दर्शनानंतर त्यांची स्थिती चमत्कारिक झाली. त्यांना लोकसहवास बिलकुल आवडेनासा

झाला व मनाची अस्वस्थता फार वाढली. नेहमी एकान्तात जाऊन त्यांनी ध्यान करावे व काही तरी विचित्र असे आचार करावेत. त्यामुळे सहाजिकच लोकांना वाटावयास लागले की त्यांना वेड लागले. चंद्रादेवीने जेव्हा त्यांच्या आचारविचारासंबंधी गोष्टी ऐकील्या तेव्हा तिला वाटले की खरोखरच आपल्या मुलाला वेड लागले. तिने मग त्यांना दक्षिणेश्वर येथून आपल्या कामारपुकूर गावी नेले व औषधोपचार सुरू केले. बाहेरची बाधा झाली असेल असे समजून अंगारे धुपारे सुद्धा केले. पण जिथे रोग किंवा भूतबाधा मुळीच नव्हती तिथे औषधांनी व इतर उपायांनी काय होणार? शेवटी त्या ठिकाणी काही दिवस राहिल्यानंतर त्यांचे मन थोडे स्थिर झाले व ते इतर माणसांप्रमाणे व्यवहार करू लागले. श्रीरामकृष्णांना ताळ्यावर आलेले पाहता त्याच्या आई व वडील भावाने त्यांचे लग्न करून देण्याचा विचार चालविला. ह्यात त्यांचा असा हेतू होता की संसारात पडल्यावर श्रीरामकृष्णांचे मन सांसारिक कामामध्ये गुंतून राहील व त्यांना दुसरीकडे लक्ष देण्यास अवसर सापडणार नाही. त्याप्रमाणे त्यांनी मुली पाहण्यास आरंभ केला पण काही केल्या योग्य अशी मुलगी लवकर मिळेना. श्रीरामकृष्णांनी त्यांच्या प्रयत्नास हरकत घेतली नाही. उलट त्यांना, एखाद्या लहान मुलाला उत्सव समारंभ जवळ आले म्हणजे जसा आनंद होतो, तसा आनंद झाला. ह्यावरून असे दिसते की देवीचीच इच्छा त्यांचे लग्न व्हावे अशी होती व त्यांनाही ती माहीत असावी. योग्य मुलगी जेव्हा लवकर सापडेना तेव्हा श्रीरामकृष्णांनीच आपणहून सांगितले की जयरामवाटीत रामचंद्र मुखोपाध्याय नावाचे गृहस्थ आहेत, त्यांच्याच मुलीशी ईश्वरी संकेताने माझे लग्न होणार आहे. हे शब्द ऐकून त्यांच्या वडील भावाला व मातोश्रीला आश्चर्य वाटले व शोध करण्याकरिता त्यांनी जयरामवाटीस माणसे पाठविली. श्रीरामकृष्णांचे शब्द खरे ठरले. रामचंद्र मुखोपाध्याय यांना एक मुलगी होती व इतर दृष्टींनी श्रीरामकृष्णांची पत्नी होण्यास योग्य असली तरी वयाने ती बरीच लहान होती. तिच्याशीच त्यांचा विवाह वयाचे २३ व्या वर्षी झाला व नवपरिणीत वधूचे सारदामणी देवी हे नाव ठेवण्यात आले. श्रीरामकृष्णांनंतर त्यांनी देखील धर्मप्रसाराचे बरेचसे कार्य पार पाडले आहे.

थोड्याच दिवसांनंतर ते दक्षिणेश्वरी परत आले, व पूर्वीप्रमाणे देवीची पूजा करू लागले. काही दिवस गेले नाहीत तोच त्यांची पूर्वीची तळमळ पुन्हा सुरू झाली. मथुरबाबूंना त्यांच्या प्रकृतीविषयी फार काळजी वाटू लागली. त्यांनी कलकत्त्यांतील श्री. गंगाप्रसाद सेन नावाच्या प्रख्यात वैद्याचे औषध त्यांना सुरू केले व ते त्यांची प्रत्येक बाबतीत अतिशय काळजी घेऊ लागले. श्रीरामकृष्णांच्या ठिकाणी असलेली त्यांची श्रद्धा दिवसेंदिवस वाढतच होती; पण एक दिवस त्यांना एक आश्चर्यकारक अनुभव आला व श्रीरामकृष्ण हे खरोखरच देवाचे अवतार आहेत अशी त्यांची खात्री झाली. एक दिवस श्रीरामकृष्ण व्हरांड्यामध्ये येरझारा घालीत होते. त्यावेळी ते कोणत्या तरी गूढ विचारात निमग्न झाले होते. मथुरबाबूंना आपल्या खोलीतून त्यांची सर्व हालचाल दिसत होती. मथुरबाबू त्यांचेकडे बऱ्याच वेळपर्यंत टक लावून पाहत होते, पण श्रीरामकृष्णांचे तिकडे लक्षच नव्हते. थोड्या वेळानंतर मथुरबाबू धावतच श्रीरामकृष्णांकडे आले व एखाद्या लहान मुलाप्रमाणे रडत त्यांनी त्यांचे पाय घट्ट धरले. श्रीरामकृष्णांनाही आश्चर्यच वाटलें व त्यांनी मथुरबाबूंना हात धरून उठविले. पूर्वस्थितीवर आल्यावर मथुरबाबूंनी त्यांच्या त्या विचित्र कृतीचे कारण श्रीरामकृष्णांना सांगितले. ते म्हणाले,''तुम्ही व्हरांड्यात फिरत असता मी तुमच्याकडे पाहत होतो. जेव्हा तुम्ही एका टोकाकडून दुसऱ्या टोकाकडे जात, तेव्हा तुम्ही मला देवीप्रमाणे दिसत, व पुन: जेव्हा तुम्ही परत फिरत, तेव्हा शिवाप्रमाणे दिसत. प्रथम मला वाटले की हा भासच असावा, पण डोळे चोळून पुन: पाहू लागलो तो प्रत्येक खेपेस मला तेच दृश्य दिसे.''

त्या दिवसापासून मथूरबाबूंची श्रीरामकृष्णांवरील भक्ती हजारो पटींनी वाढली व त्यांची सेवा करण्यात ते स्वत:ला धन्य मानू लागले.

**श्रीरामकृष्णांचा विवाह व त्याचे महत्व:-** श्रीरामकृष्णांचा विवाह लोककल्याणाकरितांच होता. वैवाहिक आयुष्यात ब्रह्मचर्यव्रताने राहून लोकहित कसे साधता येते हे त्यांनी प्रत्यक्ष उदाहरणाने जगाला सिद्ध करून दाखविले. स्त्री आणि पुरुष हा भेदभाव जोपर्यंत नष्ट होत नाही तोपर्यंत खरे ब्रह्मज्ञान प्राप्त झाले असे म्हणता येत नाही. श्रीरामकृष्णांची अवस्था पराकोटीला पोहचली असल्यामुळे ते स्वत:च्या पत्नीस श्रीजगदंबाच समजून तिच्याशी वर्तणूक ठेवीत आणि त्यांची पत्नी देखील त्यांना आपले आधिदैवत समजून त्यांची देवाप्रमाणे पूजा करी. त्यांनी तिला प्रापंचिक गोष्टीपासून तो अत्यंत गहन अशा आध्यात्मिक विषयापर्यंत सर्व गोष्टींचे शिक्षण दिले. व शुद्ध व पवित्र अत:करणाच्या श्रीशारदा देवींनी सुद्धा आपल्या शिक्षणामध्ये असामान्य प्रगती दाखवून निर्विकल्प समाधीपर्यंत मजल गाठली. ते तिला म्हणत असत,

''चांदोबा ज्याप्रमाणे साऱ्याच मुलांचा मामा, त्याचप्रमाणे ईश्वरही आपणा सर्वांचाच आहे. त्याची भक्ती करण्याचा सर्वांनाच अधिकार आहे. जो त्याची भक्ती करील, त्याला तो दर्शन देऊन कृतार्थ करील. तू त्याची भक्ती करशील तर तुलाही तो दर्शन देईल.'' असल्या सोप्या भाषेत ते श्रीसारदादेवींना उपदेश करीत व त्या देखील आपल्या पतीच्या आज्ञेप्रमाणे हुबेहुब वर्तन ठेवीत.

एक दिवस श्रीरामकृष्णांचे पाय चेपीत असता श्रीसारदादेवींनी त्यांना विचारले, ''मी कोण आहे असे तुम्हास वाटते?'' तेव्हा त्यांनी उत्तर दिले,''जी माता त्या काली मंदिरात आहे, तिनेच ह्या शरीराला जन्म दिला असून, सध्या नौबतखान्यात राहत आहे (त्यावेळी त्यांची आई काली मंदिराजवळ नौबतखान्यात राहत असे.) आणि तीच आता येथे माझे पाय चेपीत आहे! तुम्ही मला खरोखरच नेहमी साक्षात आनंदमयीच्या स्वरूपातच दिसत असता!!'' आणि खरोखरच एक दिवस त्यांनी आपल्या पत्नीची साक्षात श्रीजगदंबाज्ञानाने षोडशोपचारे पूजा केली. पूजा करीत असता, श्रीसारदादेवींना समाधी लागली व मंत्रोच्चार करता करता श्रीरामकृष्णही समाधिमग्न झाले! अशा रीतीने देवी आणि तिचा पूजक दोघेही एकरूप झाले!

पति-पत्नीचा हा असला संबंध अपूर्व नाही असे कोण म्हणेल?

## ४–साधना

**साधकभाव व साधना :-** इतर अवतारी पुरुष व श्रीरामकृष्ण ह्यांच्या चरित्रामध्ये विचार करण्यासारखा एक मोठा फरक आहे. श्रीरामकृष्णांच्या अगोदर जे अवतारी पुरुष होऊन गेले, त्यांना ईश्वर-दर्शन झाले हे खरे, पण ते होण्याकरिता त्यांनी कोणकोणत्या साधना केल्या हे त्यांनी जगाला सांगितले नाही. श्रीरामकृष्णांनी आपल्या साधनांचा इतिहास आपणाला सांगितला आहे, आणि म्हणूनच त्यांचे चरित्र वाचताना आपणास विसंगत असे काहीच वाटत नाही. त्यांनी केलेल्या साधना आपणाला त्यांची ईश्वरदर्शना विषयीची तळमळ व त्याकरिता त्यांनी केलेले उत्कट परिश्रमही दर्शवितात.

त्यांच्या साधनांविषयी लक्षात ठेवण्यासारखी दुसरी गोष्ट ही की निरनिराळ्या साधना करण्याचे वेळी मार्ग दाखविण्याकरिता योग्य गुरू त्यांचेकडे आपोआपच चालत आले व त्यांनी सुद्धा त्या त्या साधनेत अप्रतिम प्रगती दाखविली व त्यातील अंतिम ध्येय अत्यंत थोड्या अवधीत प्राप्त करून घेतले.

ह्या ठिकाणी असा प्रश्न उपस्थित होण्याचा संभव आहे की श्रीरामकृष्ण ईश्वरावतार असूनही त्यांना एवढ्या साधना का कराव्या लागाव्या? ह्याचे उत्तर श्रीरामकृष्णांनीच आपल्या शब्दांत दिले आहे. ते म्हणत, ''नरदेह धारण केल्यावर सर्व कार्य माणसासारखीच होतात. ईश्वराला माणसाप्रमाणेच सुख-दु:खाचा भोग घ्यावा लागतो व माणसाप्रमाणेच उद्योग व प्रयत्न करून सर्व विषयांवर पूर्णत्व मिळवावे लागते.'' ह्यावरून असे स्पष्ट दिसते की त्यांची साधकावस्था केवळ उदाहरणादाखल होती.

'एका भगवानावाचून मला कोणाचीही नोकरी करावयाची नाही.' असा त्यांचा पहिल्यापासूनच निश्चय होता. अर्थकारी विद्या व अनर्थकारी पैसा यांचा त्यांना अतिशय तिटकारा असे. पैशाचा मोह तर त्यांनी पूर्णपणे जिंकला होता. एका हातात काही पैसे व दुसऱ्या हातात काही माती घेऊन, 'पैसा माती, माती पैसा' असे ते म्हणत व दोन्ही वस्तू गंगेत फेकून देत. पुढे पुढे तर त्यांना पैशाला स्पर्शसुद्धा करवत नसे, एवढेच नव्हे तर धातूचे भांडे हातात घ्यावयाचे झाल्यास ते ते फडक्याने धरीत व मग त्याचा उपयोग करीत. जसा पैशाचा तसा कामिनीचा सुद्धा त्यांच्या मनावर बिलकुल परिणाम होत नसे. ''स्त्री ही देवीचा प्रत्यक्ष अंश आहे.'' ह्या भावनेने ते स्त्रीजातीकडे पहात.

अशा रीतीने कामकांचनावर विजय मिळविल्यानंतर त्यांनी आपल्या साधनेस सुरुवात केली. अहंभाव नष्ट होण्याकरिता त्यांनी गरिबांचे उच्छिष्ट ग्रहण करावे, शौचकूप झाडावे व दुसरी हलकी कामे करावी. **'त्याग व सयंम ह्यांच्या योगाने इंद्रियांना व मनाला वश करून घेतले तर साधकाचे अत:करण पवित्र व शुद्ध होते. त्या स्थितीत त्यांचे मनच त्याचा गुरू होते व त्यामध्ये उत्पन्न होणारे भावतरंग साधकाची दिशाभूल न होऊ देता त्याला ध्येयाकडे घेऊन जातात.'** हे शब्द त्यांच्या मानसिक उन्नतीची साक्ष तर देतातच पण साधकाला वरील दोन गुणांची किती आवश्यकता आहे हेही दर्शवितात.

हिंदू धर्मशास्त्रात सांगितले आहे की पाच तऱ्हेच्या भावांनी युक्त होऊन परमेश्वराची आराधना करावी. वेदकालीन ऋषींचा शांत भाव, श्रीहनुमान यांचा दास्यभाव, अर्जुन आणि वृंदावनातील गोपींचा सख्यभाव, यशोदा–कौसल्येचा वात्सल्य भाव व श्रीमती राधेचा मधुर भाव हेच ते पाच भाव होत. श्रीरामकृष्णांनी ह्या सर्व भावांनी वेगवेगळ्या वेळी युक्त होऊन परमेश्वर दर्शन करून घेतले. ह्यांपैकी तीन भावांची हकीकत ह्या ठिकाणी दिली आहे.

**श्रीरामकृष्णांचा दास्यभाव:-** दास्यभावाची साधना करीत असता त्यांनी स्वत:ला श्रीहनुमानाच्या जागी कल्पिले व अशा रीतीने स्वत:लाच हनुमान समजून ते श्रीरामाची भक्ती करू लागले. ह्या साधनेची हकीकत त्यांच्याच शब्दांत देणे योग्य होईल.

''श्रीहनुमानाच्या चरित्राचे एकाग्र चित्ताने ध्यान करीत राहिल्यामुळे मी मानव आहे ह्याचे मला पूर्णपणे विस्मरण पडले. माझे राहणे व खाणेपिणे सुद्धा हनुमानाप्रमाणेच होऊ लागले. नेसण्याचे वस्त्र कंबरेभोवती गुंडाळताना त्याचा काही भाग पाठीमागच्या बाजुला शेपटीप्रमाणे मी मुद्दाम राखून ठेवीत असे; व जमिनीवर चालण्याऐवजी एखाद्या माकडाप्रमाणे उड्या मारीत असे. मी बहुतेक झाडावरच बसून राही व 'रघूवीर, रघूवीर' असा घोष करी. माझे डोळे माकडाच्या डोळ्याप्रमाणे चंचल बनले व आश्चर्याची गोष्ट ही की माझ्या पाठीच्या कण्याचे अगदी खालचे टोक एक इंचाने अधिक वाढले. माझा भाव संपल्यानंतर कणा पूर्ववत झाला, पण साधनकाली मात्र माझी प्रत्येक कृती माकडाप्रमाणे होत असे.''

ह्या साधनकालाच्या शेवटी त्यांना एक अद्‌भुत दर्शन प्राप्त झाले हे दर्शन इतर दर्शनापेक्षा निराळे होते. त्यावेळी श्रीरामकृष्ण पंचवटीत बसले असून त्यांची स्थिती इतर मनुष्यापेक्षा निराळी नव्हती. त्यावेळी ते ध्यान किंवा जप असे काहीच करीत नव्हते. एकाएकी त्यांना एका स्त्रीची तेजोमय आकृती त्यांचेकडे येताना दिसली व त्या प्रकाशात त्यांना आजूबाजूचे सर्व पदार्थ सुद्धा दिसले. त्या आकृतीच्या तोंडावर दु:ख, प्रेम, दया ह्यांचे भाव स्पष्ट उमटले होते. ह्या दर्शनासंबंधी बोलत असता श्रीरामकृष्ण सांगत,''ती स्त्री कोण असावी हे पहिल्यांदा माझ्या ध्यानात आले नाही. पण लगेच एक माकड उडी मारून तेथे आले व तिच्या पायाजवळ बसले लगेच माझ्या लक्षात आले की जनकात्मजा सीता ती हीच असावी. भक्तीने उचंबळून जाऊन मी तिच्या पायावर डोके ठेवणार इतक्यात ती माझ्या शरीरात शिरली व माझे देहभान हरपले. ध्यान वैगरे न करता उघड्या डोळ्यांनी पाहिलेले हे माझे पहिलेच दर्शन होय.''

**भैरवी ब्राह्मणी आणि श्रीरामकृष्णांचे तंत्रसाधन:-** विवाहानंतर दक्षिणेश्वरला परत आल्यावर त्यांची गाठ भैरवी ब्राह्मणीशी पडली. भैरवी ब्राह्मणी आपणाकडे केव्हा येणार हे त्यांना अगोदरच समजले होते व तिची ते वाटच बघत होते. भैरवी ब्राह्मणी ही विलक्षण योगशक्ती असलेली एक संन्यासिनी होती. श्रीरामकृष्णांना तंत्र साधनात मदत करण्याकरिता तिला दक्षिणेश्वरी यावे लागणार हे तिला देखील अंर्तज्ञानाने आधीच समजले होते. तिने श्रीरामकृष्णांच्या दैवी अनुभवाचे रहस्य ओळखले व मातृप्रेमाने युक्त होऊन तंत्र शास्त्राच्या ६४ ग्रंथांतील सर्व साधना त्यांच्याकडून यथासांग करवून घेतल्या तंत्रशास्त्राच्या नियमांप्रमाणे त्यांना पशुभावापासून वीरभाव व वीरभावापासुन दैवभाव अशी प्रगती करावी लागली. ह्या शास्त्राची साधने अत्यंत कठीण असून साधारण प्रतीचा साधक केव्हाच डगमगून जातो; पण श्रीरामकृष्णांनी ती यशस्वी रीतीने पार पाडली व त्यातील उच्च भाव जो दैवभाव त्याची प्राप्ती करून घेतली.

भैरवी ब्राह्मणीचे दुसऱ्याही एका दृष्टीने फार महत्व आहे. तिनेच प्रथमत: लोकांना निर्भयपणाने सांगण्यास सुरुवात केली की श्रीरामकृष्ण हे अवतारी पुरुष आहेत व मथुरबाबूंनी देखील त्यावेळच्या विद्वान पंडितांची सभा बोलावून शास्त्रामध्ये सांगितलेली अवतारी पुरुषांची लक्षणे व श्रीरामकृष्णांच्या ठिकाणी दिसून येणारी लक्षणे यांची तुलना करविली. त्यावेळी त्यांना दिसून आले की भैरवी ब्राह्मणीचे शब्द खरेच आहेत. तिच्या आगमनापासुनच लोकांचा श्रीरामकृष्णाविषयी असलेला ग्रह पालटला व ते त्यांना देवाप्रमाणे भजू लागले.

**जटाधारी व श्रीरामकृष्णांचा वात्सल्यभाव:-** तंत्रसाधनानंतर श्रीरामकृष्णांनी वात्सल्यभावाचे साधना केली. आपण नेहमीच्या व्यवहारात पाहतो की मानवी प्रेमामध्ये एक विशेष प्रकारची आकर्षक शक्ती असते. ह्या प्रेमाचा प्रभाव माता-पुत्र, बंधु–भगिनी, पति-पत्नी यांच्या संबंधात दिसून येतो. हेच मानवी प्रेम अत्यंत उत्कट करून जर परमेश्वराकडे लावले तर तो सुद्धा प्रसन्न होऊन आपल्यावर कृपा करतो. जसे एखादे वडील माणूस मुलाचा हात धरते, त्याला इकडे तिकडे घेऊन जाते व त्याच्याशी गोष्टी करते, तसेच आपणाला ईश्वराशीसुद्धा करता येते, हे श्रीरामकृष्णांच्या वात्सल्यभाव साधनेवरून दिसून येते.

जटाधारीला सुद्धा असाच अनुभव येत असे. ते रामायत पंथाचे साधू असून त्यांच्याजवळ रामललाची (बालक-रामाची) एक लहान मूर्ती असे. ह्या मूर्तीवर ते पित्याप्रमाणे प्रेम करीत. तिला प्रत्यक्ष 'राम' समजून तिच्याशी वागणूक ठेवीत व ती मूर्ती सुद्धा एखादे बालक जसे पित्याबरोबर हसते व खेळते, तसे त्यांच्याशी हसे व खेळे. जटाधारीला प्रत्यक्ष दिसे की रामलला नैवेद्य खात आहे, अथवा एखादा पदार्थ मागत आहे, अथवा फिरायला न्या म्हणत आहे.

सन १८६४-६५ च्या सुमारास जटाधारी फिरत फिरत दक्षिणेश्वरास आले. श्रीरामकृष्णांनी जटाधारीला पाहिले व ओळखले की त्यांच्यामध्ये काहीतरी दैवी शक्ती असावी. रामललाशी असलेला त्यांचा संबंध त्यांनी लक्षपूर्वक पाहावा व त्यांचेही अत:करण अतिशय वात्सल्ययुक्त असल्यामुळे त्यांनाही रामलालाची हालचाल दिसावी. कौसल्येने रामावर बालपणी जसे प्रेम केले तसेच श्रीरामकृष्णांचे रामललावर प्रेम असे. ते सांगत, ''मी जटाधारीबरोबर पुष्कळसा वेळ घालवीत असे व रामललाला प्रत्यक्ष पाहत असे. पुढे पुढे रामललाला माझ्यावाचून करमेनासे झाले व जेव्हा मी तेथून निघून जाई, तेव्हा रामललासुद्धा माझ्या पाठोपाठ खोलीत चालत येई. प्रथमत: मला असे वाटे की हा काहीतरी भास असावा पण तोच अनुभव मला दररोज येई. तुम्ही जसे मला माझ्या समोर दिसता, तसाच रामललासुद्धा मला दिसे व माझ्या बरोबर नाचे, खांद्यावरून उड्या मारी व कडेवर घेण्याचा सुद्धा आग्रह करी!.''

जटाधारीची मनीषा रामललाने पूर्ण केली व त्यांच्या इच्छित स्वरूपात त्यांना दर्शन दिले. पुढे रामललाच्याच सांगण्यावरून त्यांनी त्याला श्रीरामकृष्णांच्या जवळ ठेविले व ते दक्षिणेश्वर सोडून निघून गेले. तेव्हापासून रामलला श्रीरामकृष्णांजवळच राहिला.

रामललाची ही हकीकत श्रीरामकृष्णांचा पराकाष्ठेचा वात्सल्यभाव दर्शविते. मानवी प्रेम हे खरोखरच दैवी प्रेमापुढे फिके पडते. स्थळ, काळ आणि सामाजिक बंधने ह्यांनी मानवी प्रेम मर्यादित झालेले असते परंतु ईश्वरी प्रेम ह्या सगळ्यांच्या पलीकडे आहे. मानवी प्रेमामधूनच आध्यात्मिक प्रेम कसे निर्माण करता येते, हे आपणास 'रामकृष्ण-रामलाला' ह्यांच्या उदाहरणावरून स्पष्टपणे दिसून येते.

**श्रीरामकृष्णांचा मधुरभाव:-**वात्सल्यभावाची साधना संपविल्यानंतर श्रीरामकृष्णांनी मधुरभावाची साधना करण्यास सुरुवात केली. मधुरभाव हा सर्व भावांमध्ये अत्यंत उच्च असून, त्यात स्त्री व पुरुष हा भेद राहत नाही. एखाद्या स्त्रीचे आपल्या प्रियकरावर ज्या प्रकारचे कामगंधहीन प्रेम असते, त्याच प्रकारचे प्रेम, साधक आणि उपास्य दैवत ह्यामध्ये असते. ह्या प्रेमाच्या ओघात दोघेही एकरूप होऊन जातात. असल्या तऱ्हेचा मधुरभाव श्रीचैतन्यांनी प्रगट केला होता व पुराणांतरी ह्याच भावाचे वर्णन वृंदावनातल्या कृष्णलीलेमध्ये आढळते. गोपींचे श्रीकृष्णावरील प्रेम मधुरभावात्मकच होते. त्यांना कोणताही स्वार्थी हेतू साधावयाचा नव्हता किंवा सुखाची लालसा सुद्धा त्यांच्या मनात नव्हती. असले निर्हेतुक प्रेम ह्या जगात आढळणे कठीण आहे. सर्व भावांचा मिलाप ज्या भावामध्ये झाला आहे असा महाभाव, गोपींमध्ये श्रेष्ठ असणाऱ्या श्रीराधेमध्येच आढळतो. राधेप्रमाणे स्वत:ला विसरून जाऊन श्रीकृष्णावर प्रेम करणे हे एक प्रकारचे परमेश्वरप्राप्तीचे साधनच आहे. ही साधना करीत असता साधक स्वत:ला श्रीराधा समजून श्रीकृष्णाची सेवा करतो व स्वत:चे सुखदु:ख विसरून जाऊन आपल्या आराध्य देवतेला प्रसन्न करण्याचा यत्न करतो.

श्रीरामकृष्णांना मधुरभावसाधनेची इच्छा झाली. मथुरबाबूला ते समजताच त्यांनी त्या साधनेला आवश्यक असणारी सर्व सामग्री श्रीरामकृष्णांना पुरविली. जी साधना करावयाची असेल त्या साधनेला योग्य असा पेहेराव श्रीरामकृष्ण करीत असत. गोपीरूपाने आराधना करावयाची असल्यामुळे त्यांनी स्त्रीवेष परिधान केला व ते स्वत:ला वृंदावनातील एक गोपी समजू लागले. सहा महिनेपर्यंत त्यांनी ती साधना चालविली आणि त्या अवधीत त्यांची वागणूक व विचार थेट गोपीप्रमाणेच होते.

श्रीराधेचे श्रीकृष्णावर अत्यंत प्रेम असल्यामुळे, असे सांगतात की श्रीराधेची कृपा झाल्याशिवाय श्रीकृष्णाचे दर्शन होत नाही. तेव्हा श्रीरामकृष्णांनी राधामाईची अत्यंत भक्तीने उपासना चालविली, आणि थोडक्याच अवधीत श्रीराधादेवींनी त्याना दर्शन दिले. श्रीरामकृष्ण म्हणत, ''श्रीराधादेवीच्या सौंदर्याचे वर्णन करता येणे अशक्य आहे. तिच्या मुखावरच्या भावांवरून स्पष्ट दिसत होते की तिने श्रीकृष्णासाठी स्वत:च्या सुखावर पाणी सोडले होते.''

श्रीराधादेवीचे दर्शन झाल्यापासून ते स्वत:स राधा समजू लागले व श्रीकृष्णाचे सतत ध्यान करण्यास त्यांनी सुरुवात केली. शेवटी त्यांचा महाभाव पराकोटीला जाऊन पोहोचला; श्रीकृष्णांनी त्यांना दर्शन दिले व ते स्वत: श्रीरामकृष्णांच्या शरीरात अंतर्धान पावले. ह्या दर्शनानंतर काही वर्षांनी शिष्याशी बोलत असता गवतावरचे एक निळे फूल उचलून ते म्हणाले, ''साधन करीत असता श्रीकृष्णांनी मला दर्शन दिले तेव्हा त्यांचा वर्ण ह्या फुलाप्रमाणेच होता.''

ह्याप्रमाणे या साधनेचेही अंतिम ध्येय त्यांनी गाठले. पुढे एक दिवस विष्णूच्या देवळात भागवत ऐकत बसले असता त्यांना एक विशिष्ट दर्शन घडले. भागवत ऐकता ऐकता त्यांना समाधी लागली व त्यांना असे दिसले की भगवान् श्रीकृष्ण त्यांचे पुढे उभे असून त्यांच्या पदकमलातून तेजस्वी किरणाचा झोत

बाहेर पडत आहे. त्या प्रकाशाने प्रथम भागवताला स्पर्श केला व मग तेथून तो त्यांच्या हृदयाला येऊन मिळाला, व काही काळपर्यंत त्या झोताने तिघांनाहीं एकमेकांशी जोडून टाकले. श्रीरामकृष्ण म्हणत,''ह्या विलक्षण अनुभवाचा अर्थ हाच की भगवान् त्याचे शब्द व भक्त हे तिघेही निरनिराळे दिसले तरी एकच आहेत.''

**तोतापुरी व श्रीरामकृष्णांची वेदान्तसाधना:-** मधुरभाव साधनेच्या वेळी त्यांनी भाव-साधनांची अंतिम सीमा गाठली होती. आता त्यांना भावातीत अशा वेदान्तोक्त अद्वैत भावाची साधन करण्याची प्रबळ इच्छा उत्पन्न झाली. ह्या ठिकाणी कुणी अशी शंका घेईल की परमेश्वरदर्शनानंतर देखील श्रीरामकृष्णांनी इतर साधना का केल्या? त्यांना तर जगत्कारणाचा अनुभव होता, मग त्यांनी अधिक साधनांचा खटाटोप कशाला केला? असल्या तऱ्हेच्या प्रश्नाला श्रीरामकृष्णांनीच उत्तर दिले आहे. ते म्हणतात, ''हे पाहा, जो समुद्र-किनाऱ्यावर सर्वदा वास करतो, त्याच्या मनात कधी कधी असे येते की, या रत्नाकर समुद्रामध्ये काय काय रत्ने आहेत ती पाहू'', त्याप्रमाणे जगन्मातेचे दर्शन होऊनही तिला निरनिराळ्या भावांत व रूपांत पाहावे असे श्रीरामकृष्णांना वाटे व त्यांची इच्छा जगन्माताच सर्व तऱ्हेच्या आवश्यक गोष्टींची सोय करून देऊन पुरवी. अशा रीतीने भिन्न भिन्न मतांची साधना तिनेच त्यांच्याकडून करवून घेतली.

इतर साधनांप्रमाणे वेदान्त साधनेच्या वेळी सुद्धा त्यांना गुरूचा शोध करावा लागला नाही. श्रीमत् परमहंस तोतापुरी हे त्यांचे गुरू होत. सतत चाळीस वर्षांच्या दीर्घ प्रयत्नाने त्यांना निर्विकल्प समाधी साध्य झाली. ते नेहमी नग्न राहत असत, आणि म्हणूनच श्रीरामकृष्ण त्यांना 'न्यांगटा' (नग्न) म्हणत. यात्रा करीत असता ते दक्षिणेश्वरी येऊन पोहोचले. गंगेच्या तीरावर श्रीरामकृष्णांना ध्यान करीत असता त्यांनी पाहिले व प्रथमदर्शनीच वेदान्तसाधनेचे ते योग्य अधिकारी आहेत अशी त्यांची खात्री झाली. श्रीमत् तोतापुरींनी श्रीरामकृष्णांना, 'तुझी वेदान्तसाधना करण्याची इच्छा आहे काय?' असे विचारले व श्रीरामकृष्णांनी आपल्या नेहमीच्या रीतीप्रमाणे श्रीजगदंबेची परवानगी मागून श्रीमत् तोतापुरींच्या म्हणण्यास होकार दिला. वेदान्तसाधनेची दीक्षा घेण्यापूर्वी संन्यास घ्यावा लागतो. त्याप्रमाणे श्रीमत् तोतापुरींनी श्रीरामकृष्णांना संन्यास दिला व त्यांनीच श्रीरामकृष्णांना 'रामकृष्ण' हे नवीन नाव दिले. नंतर ते त्यांना समाधी अवस्था प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करू लागले. ध्यान करते समयी श्रीजगदंबेची मूर्ती डोळ्यापुढे नेहमी उभी राहत असल्यामुळे प्रथम श्रीरामकृष्णांचे मन निर्विकल्प होत नसे. तेव्हा श्रीमत् तोतापुरींनी काचेचा एक तुकडा घेऊन त्याचे सुईसारखे तीक्ष्ण टोक श्रीरामकृष्णांच्या दोन भुवयांमध्ये जोराने टोचले व म्हटले,'ह्या ठिकाणी आपले मन एकाग्र कर.' मग श्रीरामकृष्णांनी दृढ निश्चय करून ध्यान केले व पूर्वीप्रमाणे श्रीजगदंबेची मूर्ती डोळ्यापुढे येताक्षणी, ज्ञानाला तलवार कल्पून तिने त्या मूर्तीचे मनातल्या मनात दोन तुकडे करून टाकले. तेव्हा मग मनामध्ये कोणताच विकल्प उरला नाही व ते भावाच्या सीमेपलीकडे जाऊन समाधिमग्न झाले. हीच त्यांची पहिली निर्विकल्प समाधी! ही त्यांना तीन दिवसांतच साध्य झाली. श्रीमत् तोतापुरी त्यांची स्थिती पाहून आश्चर्याने स्तंभित झाले; कारण त्यांना ती प्राप्त करून घेण्यास सतत चाळीस वर्षे दीर्घोद्योग करावा लागला. निर्विकल्प समाधी प्राप्त झाल्यानंतर ते त्या अवस्थेत एकसारखे सहा महिनेपर्यंत राहिले. ते म्हणत,**'ज्या अवस्थेला पोहोचले असता, साधारण साधक तेथून पुनः परत फिरू शकत नाही, एकवीस दिवसांतच त्याचे शरीर पिकलेल्या पानाप्रमाणे गळून पडते, त्या अवस्थेत आईच्या कृपेने पुरे सहा महिने होतो!'**

अद्वैतभावामध्ये वास करीत असता त्यांना एक तत्त्व पुरतेपणी कळून चुकले होते, ते हे की, 'अद्वैतभावामध्ये स्थिर होणे' हेच सर्व प्रकारच्या साधन-भजनादिकांचे अंतिम ध्येय होय. त्यांनी निरनिराळया धर्माच्या साधना केल्या व त्यांना हाच अनुभव आला की साधक शेवटी ह्याच अवस्थेला जाऊन पोहोचतो. **'जितकी मते, तितके मार्ग; परंतु हे सर्व मार्ग मनुष्याला एकाच अद्वैत स्थितीप्रत नेऊन पोहोचवितात'** हा त्यांचा सिद्धान्त सर्व धर्मांची एकी घडवून आणण्याच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे.

**श्रीरामकृष्णांची इस्लामधर्म साधना:-** हिंदुधर्मशास्त्राप्रमाणे साधना केल्यानंतर इतर धर्मांची साधना करून, निराळ्या स्वरूपांत परमेश्वरास पाहण्याची श्रीरामकृष्णांना उत्सुकता वाटू लागली व म्हणून त्यांनी इस्लाम व ख्रिस्ती ह्या दोन परकीय धर्मांची साधना केली.

इस्लाम धर्म साधनेच्या वेळीसुद्धा त्यांना गुरूकरिता बाहेर फिरावे लागले नाही. ह्या धर्माचे रहस्य त्यांना गोविंदराय यांच्याकडून समजले. गोविंदराय हे मूळचे जातीने क्षत्रिय असून त्यांना अरबी व फारसी भाषांचे चांगले ज्ञान होतें. निरनिराळ्या धर्मांचा अभ्यास करीत असता, इस्लाम धर्माची तत्त्वे पसंत पडून त्यांनी त्या धर्माचा स्वीकार केला व तेव्हापासून ते कुराणाचे वाचन व त्यात सांगितलेल्या साधनांचे अनुष्ठान

ह्यांतच निमग्न राहू लागले. दक्षिणेश्वरी आल्यानंतर त्यांच्या प्रेमळ व सरळ स्वभावामुळे त्यांची व श्रीरामकृष्णांची लवकरच मैत्री जमली. त्यांच्याच करवी त्यांना इस्लाम धर्माची ओळख झाली व त्यांच्या संगतीत काही काळ घालविल्यानंतर त्यांना वाटू लागले, ''इस्लाम धर्मसुद्धा ईश्वरप्राप्तीचा एक मार्गच नाही का? अनंतलीलामयी जगदंबा या मार्गानें जाणाऱ्यांना ती कोणत्या रीतीने तृप्त करते ते अवश्य पाहिले पाहिजे. कदाचित् गोविंदरायांना इथे पाठविण्यात तिचा हाच हेतू असेल. त्यांच्याच जवळ ह्या मार्गाची दीक्षा घ्यावी म्हणजे झाले.''

असा विचार मनात येताक्षणीच, त्यांनी तो गोविंदरायांजवळ प्रगट केला व मुसलमानी धर्माची दीक्षा घेऊन यथाविधि साधनांना सुरुवात केली व तीनच दिवसांत त्यांनी इस्लाम धर्माचे अंतिम ध्येय गाठले.

साधनकालाची हकीकत त्यांनी स्वत:च्याच शब्दांत सांगितली आहे. त्यावेळी ते 'अल्ला' मंत्राचा जप करीत असत. त्याचप्रमाणे एखाद्या फकीराप्रमाणे कासोटा न घालता धोतर नेसत व तीन वेळा नमाज पढत. इस्लाम धर्माशी त्यांचे अंतरंग इतके एकरूप झाले होते की त्यांचा हिंदू भाव नि:शेष नाहीसा झाला व हिंदू देवदेवतांना नमस्कार करण्याचे तर दूरच राहो पण त्यांचे दर्शन घेण्याकडे सुद्धा त्यांच्या मनाची प्रवृत्ति होत नसे. अशा रीतीने तीन दिवस गेल्यानंतर ते इस्लाम धर्माच्या अंतिम ध्येयाजवळ येऊन पोहोचले व त्यांना अद्भुत दर्शन प्राप्त झाले. प्रथम त्यांना एक लांब दाढी वाढलेला, गंभीर, भव्य व ज्योतिर्मय असा पुरुष दिसला व मग त्यांचे मन अतैद्व भावात लीन होऊन गेले.

**श्रीरामकृष्णांची ख्रिस्तमतसाधना:-** इस्लामधर्मसाधनेनंतर त्यांनी ख्रिस्ती धर्माची साधना करण्यास सुरुवात केली. येशू ख्रिस्त, महंमद पैगंबर वगैरे जे श्रेष्ठ धर्मसंस्थापक होऊन गेले, ते खरे पाहिले असता एकाच पुरुषाची निरनिराळी रूपे आहेत,''**तो एकच पुरुष-बुडी मारुन, इकडे बाहेर निघून श्रीकृष्ण झाला; तिकडे बाहेर निघून येशू झाला.**''असेच श्रीरामकृष्णांना नेहमी वाटत असे. श्री शंभुचंद्र मल्लिक यांच्या सहवासाने त्यांना बायबलांतील येशू ख्रिस्ताच्या पवित्र जीवनाची व संप्रदायाची थोडीफार माहिती झाली होती. श्रीरामकृष्णांच्या स्वभावधर्मानुसार त्यांना ह्याही वेळी ख्रिस्तमताची साधना करून त्यातील अत्युच्च ध्येय हस्तगत करण्याची इच्छा झाली व श्रीजगदंबेने त्यांची इच्छा पूर्ण केली.

कालीमंदिराच्या आवाराच्या दक्षिणेस यदुनाथ मल्लिक यांचा बगीचा व बंगला असे. त्या बंगल्यातील दिवाणखान्यात निरनिराळी चित्रे होती, त्यांतच आपल्या आईच्या—मेरीच्या—मांडीवर बसलेल्या येशू ख्रिस्ताचेही एक सुंदर चित्र होते. श्रीरामकृष्ण सांगत असत की एक दिवस दिवाणखान्यात बसले असताना ते येशूख्रिस्ताच्या चरित्रासंबंधी तन्मयतेने विचार करीत होते व त्याच वेळी त्या चित्राकडेही पाहत होते. इतक्यात त्यांना असे दिसले की ते चित्र जिवंत व ज्योतिर्मय झाले असून त्यातून तेजाचे किरण बाहेर पडत आहेत व ते त्यांच्या अंगांत शिरून त्यांच्या भावांचे परिवर्तन करीत आहेत. त्यावेळी त्यांच्या मनांतील हिंदू संस्कार नाहीसे झाले व त्यांच्या जागी येशू ख्रिस्ताच्या संप्रदायावरील भक्ती व विश्वास निर्माण झाला. इस्लामधर्मसाधनेच्या वेळी त्यांची जशी अवस्था झाली होती, तशीच ती आताही झाली व त्यांचे हिंदू देवदेवतांवरील प्रेम नाहीसे झाले. दक्षिणेश्वरी परत आल्यावर सुद्धा ते येशूच्या ध्यानात निमग्न असत. शेवटी तिसरे दिवशी संध्याकाळी पंचवटीखाली हिंडत असता त्यांना दिसले की एक दिव्य व गौर वर्णाचा भव्य पुरुष त्यांचेकडे येत आहे. त्या आकृतीकडे पाहून, 'हा देवासारखा दिसणारा पुरुष कोण असावा?' असा विचार ते करू लागले, तोच अंत:करणातून ध्वनि निघाला,'अरे, हा पुरुष तर येशू ख्रिस्तच!' इतक्यात त्या पुरुषाने श्रीरामकृष्णांना आलिंगन दिले व तो त्यांच्या शरीरात अंतर्धान पावला. अशा रीतीने ख्रिस्ती धर्माचे अंतिम ध्येयही त्यांना प्राप्त झाले.

बुद्ध धर्मासंबंधी सुद्धा त्यांच्या हृदयात विशेष प्रकारचा आदर वसत असे. इतर हिंदूंप्रमाणे त्यांचीही बुद्धदेव हे साक्षात् ईश्वरावतार होऊन गेले अशी दृढ श्रद्धा असे. पुरी क्षेत्राच्या जगन्नाथ मूर्तीमध्ये श्रीबुद्धदेवाचा प्रकाश अद्यापही आहे असे ते मानीत. त्याचप्रमाणे त्यांची जैन धर्मावर व शीख धर्मावरही भक्ती असे. त्यांच्या खोलीत इतर देवदेवतांच्या तसबिरी तर असतच पण त्याबरोबरच महावीर तीर्थंकराची एक पाषाणमूर्ती व येशू ख्रिस्ताची एक तसबीर असे. दररोज सकाळ संध्याकाळ इतर चित्रांबरोबरच याही, चित्रांना ते धूपदीप दाखवीत! शिखांच्या दहा गुरूंसंबंधाने ते म्हणत, ''ते सारे जनक ऋषीचे अवतार होते. देहत्यागाचे वेळी जनक राजाच्या मनात लोककल्याण करण्याची वासना उत्पन्न झाली व म्हणून त्याने नानकापासून गुरु गोविंदापर्यंत दहा गुरूंच्या रूपाने अवतार घेऊन, शीख लोकांत धर्मसंस्थापना केली.''

जशी त्यांची इतर धर्मांवर श्रद्धा असे, तशीच श्रद्धा ते इतर संप्रदायांबद्दल सुद्धा बाळगीत व त्या

संप्रदायांच्या अनुयायांशी प्रेमाने मिळून मिसळून वागत. त्या काळी बंगालमध्ये ब्राह्मसमाजाची स्थापना झाली असून त्याचे पुढारीपण सुप्रसिद्ध श्रीकेशवचंद्रसेन यांचेकडे होते. त्यांची श्रीरामकृष्णावर पराकाष्ठेची भक्ती असे व ते त्यांना साक्षात् धर्ममूर्ती समजत. उलटपक्षी श्रीरामकृष्णांचेही त्यांच्यावर अपार प्रेम असे. केशवचंद्रांच्या बुद्धिमत्तेची, भक्तीची व वक्तृत्वाची ते सर्वांजवळ प्रशंसा करीत व श्रीजगदंबेजवळ 'केशवचंद्राची कीर्ती' सहस्त्रपट वाढो अशी नेहमी प्रार्थना करीत. श्रीरामकृष्णांचे त्यांच्यावर किती अपरिमित प्रेम होते हे केशवचंद्रांना देवाज्ञा झाली त्यावेळी सगळ्यांना दिसून आले. श्रीरामकृष्ण म्हणत, ''केशवच्या मृत्यूची बातमी ऐकून मी तीन दिवस अंथरुणावर पडून होतो. असे वाटले की माझे एक अंग गळून गेले!'' त्याचप्रमाणे विजयकृष्ण गोस्वामी, प्रतापचंद्र मुजुमदार, शिवनाथ शास्त्री वगैरे ब्राह्मसमाजातील पुढाऱ्यांवरही त्यांचे निरतिशय प्रेम असे.

अशा रीतीने श्रीरामकृष्णांचा जगातील निरनिराळ्या मुख्य धर्मांशी परिचय झालेला होता. त्यांनी बहुतेक सर्व धर्मांतील अनुष्ठाने केली व त्यांतील अत्युच्च ध्येय प्राप्त करून घेतले. त्या स्वत:च्या अनुभवांवरूनच त्यांनी सिद्ध करून दाखविले की जितकी मते आहेत तितकेच मार्ग आहेत. कोणत्याही धर्माने चालले तरी शेवटी मनुष्य एकाच परमेश्वराप्रत जाऊन पोहचतो. हा सिद्धान्त जुना तर खराच, परंतु त्यात अपूर्व असे एवढेच आहे की श्रीरामकृष्णांनी निरनिराळ्या धर्मांतील साधनांचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन मग तो जगासमोर मांडला आणि ह्यामुळेच आजच्या आध्यात्मिक जगात ह्या सिद्धान्ताचे महत्त्व फार मोठे आहे.

**श्रीरामकृष्णांचा सर्वात्मभाव:-** विराट अहंकार, म्हणजे 'मी तो विश्वव्यापी आहे' अशी भावना जेव्हा मनुष्याच्या अंत:करणात निर्माण होते तेव्हा त्याला असे वाटावयास लागते की सर्व वस्तुमात्रांमध्ये एकच तत्त्व भरले आहे. ही भावना ज्या पुरुषाची झाली असेल, त्याला दुसऱ्यांना झालेले सुखदु:ख स्वत:ला झाले आहे असे अनुभवास येते. श्रीरामकृष्णांची भावना ह्याच जातीची होती. एकदा ते कालीमंदिरांतील आवारात उगवलेल्या हिरव्या गार गवताकडे तन्मयतेने पाहत होते. त्या जागेशी एकरूप होऊन त्यांना वाटावयास लागले की ही जागा त्यांच्या शरीराचा एक भागच आहे. इतक्यात एक मनुष्य त्या गवतावरून चालत गेला. श्रीरामकृष्ण सांगत, ''आपल्या छातीवरून कोणी चालत गेल्यास जशा वेदना होतील तशा वेदना मला त्यावेळी झाल्या आणि छाती काही वेळ लाल होऊन गेली.''

मनुष्यमात्रामध्ये एकच परमेश्वर भरलेला आहे हा त्यांचा दृढ विश्वास ते सोप्या सोप्या उदाहरणांनी समजावून सांगत. उदाहरणार्थ, ते म्हणत मनुष्यप्राणी हा गाद्यागिरद्यांच्या खोळीप्रमाणे आहे. त्या जशा निरनिराळ्या रंगांच्या व आकारांच्या असतात त्याप्रमाणेच माणसेसुद्धा कोणी सुरूप, कुरूप, कोणी साधू, कोणी दुष्ट अशी असतात. परंतु सर्व खोळीत जसा कापूस हा एकच पदार्थ भरलेला असतो तसा सर्व मनुष्यमात्रामध्ये एकच सच्चिदानंद भरलेला आहे.''

हा त्यांचा सर्वात्मभाव त्यांना गरिबांविषयी वाटणाऱ्या अनुकंपेमध्ये दिसून येतो. एकदा मथुरबाबूबरोबर काशीयात्रेस चालले असता वैद्यनाथाजवळच्या एका खेड्यातून ते जात होते. तेथील लोकांचे दारिद्र्य, दु:ख पाहून श्रीरामकृष्णांचे अंत:करण कळवळले व ते मथुबाबूला म्हणाले, ''तू तर आईचा कोठीवाला आहेस, या सर्व लोकांना प्रत्येकी एकेक वस्त्र व पोटभर जेवण दे.'' मथुरबाबूंनी त्यांच्या इच्छेप्रमाणे केले व त्या दरिद्री लोकांचा आनंद पाहून श्रीरामकृष्णांना समाधान झाले; व मग ते पुढे गले. दरिद्रनारायणसेवा त्यांना फार आवडत असे. आज देखील त्यांचे अनुयायी त्यांच्या वार्षिक उत्सवाचे वेळी हजारो गरिबांना अन्नदान करतात व गरिबांच्या ह्या नम्र सेवेत स्वत:ला धन्य मानतात.

## ५–श्रीरामकृष्ण-विवेकानंद.

**गुरुभाव व स्वामी विवेकानंदांचा परिचय:-** श्रीरामकृष्णांच्या ठिकाणी गुरुभावाचा प्रकाश अगदी लहानपणापासून होता. ज्ञानलाभानंतर जसे वर्तन असावे, तसे वर्तन त्यांचे लहानपणापासूनच असे. बालपणीच त्यांना उच्च समाधिस्थितीचा अनुभव आला होता; तरीपण तारुण्यावस्थेत त्यांच्या साधना पूर्ण झाल्यानंतर ते यथार्थ गुरुपदवीवर आरूढ झाले असे म्हणण्यास हरकत नाही. त्यांच्या अलौकिक गुरुभावामुळेच त्यांचे शिष्य, ज्याप्रमाणे कमळ प्रफुल्लित झाले म्हणजे भुंगे आपोआप त्याचेकडे धावून जातात, त्याचप्रमाणे त्यांचेकडे आपणहूनच चालत आले; आणि ह्याच शिष्यांच्या करवी त्यांनी लोककल्याणाचे महत्कार्य घडवून आणले. ह्या शिष्यवर्गामधील श्रीमत् स्वामी विवेकानंदांचे नाव जगप्रसिद्ध आहे.

त्यांचे मूळचे नाव नरेंद्रनाथ दत्त. लहानपणापासूनच ते अत्यंत बुद्धिमान, सत्यनिष्ठ, साहसी व

स्वातंत्र्यप्रिय असत. ध्यान करणे हे बालपणापासूनच त्यांना आवडे व त्यात ते केव्हाच तन्मय होऊन जात. विद्यार्थिदशेत असताना ते ब्राह्मसमाजाचे अनुयायी होते व ईश्वरदर्शनाची तळमळ त्यांना त्या वेळेपासूनच लागली. 'आपणाला ईश्वरदर्शन केव्हा होईल?' हाच विचार त्यांच्या मनात रात्रंदिवस वसत असे. महर्षी देवेंद्रनाथ टागोर प्रभृति निरनिराळ्या पंथांच्या साधकास त्यांनी विचारवे,'आपण देव पाहिला आहे काय?' परंतु कुणाकडूनच त्यांना निश्चयात्मक उत्तर मिळाले नाही. शेवटी ते श्रीरामकृष्णांकडे गेले. त्यांनाही त्यांनी तोच प्रश्न विचारला. श्रीरामकृष्णांनी नि:शंकपणे उत्तर दिले, **''बेटा, मी देव पाहिला आहे. ज्याप्रमाणे तू मला समोर दिसत आहेस, त्याचप्रमाणे देव मला समोर मूर्तिमंत दिसतो, किंबहुना तुझ्यापेक्षाही देव मला प्रत्यक्ष वाटतो आणि तुझी इच्छा असल्यास मी तुला देवाची प्रत्येक्ष भेट करून देईन!''** हे शब्द ऐकून नरेंद्रांच्या आनंदाला सीमा उरली नाही व त्यावेळेपासूनच त्यांचा श्रीरामकृष्णांशी अधिक निकटचा संबंध येऊ लागला.

स्वामी विवेकानंदाचा स्वभाव अभिमानी व चिकित्सक असल्यामुळे एखाद्या गोष्टीवर ते एकदम विश्वास ठेवीत नसत. श्रीरामकृष्णांनी त्यांचा स्वभाव ओळखला व आपल्या दिव्य शक्तीच्या साहाय्याने त्यांना हवे असलेले अनुभव आणून देऊन त्यांनी त्यांच्या मनातील संशय दूर केले. श्रीरामकृष्णांचे असेच म्हणणे असे की शिष्याने गुरूची सर्व बाजूंनी परीक्षा केल्याशिवाय त्यावर विश्वास ठेवू नये. त्याप्रमाणे स्वामी विवेकानंदांनीही आपल्या गुरूची सर्वतऱ्हेने परीक्षा करून आपल्या मनातील शंका फेडून घेतल्या व मग खात्री झाल्यानंतरच आपले जीवनसर्वस्व गुरूचे पदकमली अर्पण केले.

जे अवतारी महापुरुष असतात त्यांचे ठिकाणी, दुसऱ्याला स्पर्श करून, किंवा त्याचेकडे पाहून अथवा केवळ इच्छेने त्याची मन:स्थिती बदलवून टाकण्याचे सामर्थ्य असते; एवढेच नव्हे तर अशा पुरुषाला नुसत्या स्पर्शमात्रेकरून दुसऱ्याला निर्विकल्प समाधीसारख्या उच्च अवस्थेमध्ये नेता येते. श्रीरामकृष्णांच्या ठिकाणी ही शक्ती पूर्णपणे वास करीत होती. स्वामी विवेकानंद हे जेव्हा प्रथमत: श्रीरामकृष्णांकडे आले, तेव्हा त्यांचा उच्च अध्यात्मिक अवस्थांवर विश्वास नव्हता, कारण पाश्चात्त्य शिक्षणामुळे त्यांची प्रवृत्ती शंकेखोर बनली होती. श्रीरामकृष्णांना स्वामी विवेकानंदांकडून धर्मकार्य घडवून आणावयाचे होते आणि म्हणून त्यांची अशी तीव्र इच्छा असे की स्वामी विवेकानंदांचा अद्वैत तत्वज्ञानावर विश्वास बसावा. ह्याच कारणास्तव त्यांनी स्वामी विवेकानंदांना आपल्या दिव्य स्पर्शशक्तीने समाधीसारख्या उच्च स्थितीचा अनुभव आणून दिला व त्यांच्या विचारांत क्रांती घडवून आणली. ह्यासंबंधी स्वामी विवेकानंदांचेच शब्द लक्षात ठेवण्याजोगे आहेत. ते म्हणत, ''काही विशेष प्रकारच्या सिद्धी प्राप्त करून घेऊन त्यांच्या बळावर चमत्कार घडवून आणणे ही काही विशेषशी गोष्ट नाही; पण हा दक्षिणेश्वरच्या देवळातला अशिक्षित पुजारी, एखाद्या चिखलाच्या गोळ्याला जसे वाटेल तसे आकार द्यावे तसे, लोकांच्या मनाला वाटेल तसे आकार देई, त्यांची वाटेल तशी घडामोड करी व स्पर्शाने अथवा इच्छेने त्यांच्या मनातील विचारप्रवाह वाटेल तसे बदलून टाकी. यापेक्षा अधिक आश्चर्यकारक चमत्कार, मी कुठेही कधीही पाहिला नाही!''

श्रीरामकृष्णांच्या अलौकिक शक्ति-प्रभावाने स्वामी विवेकानंदांच्या विचारात एकदम फरक घडून आला. त्यांच्या दैवी शक्तीपुढे आपली बुद्धी किती अल्प आहे ह्याचा त्यांना अनुभव आला, व केवळ इच्छामात्रेकरून वाटेल त्याचे मन उच्च मार्गाकडे सहज लीलेने वळविणारा हा मनुष्य सामान्य नसून अलौकिक योग्यतेचा महापुरूष असला पाहिजे अशी त्यांची पूर्ण खात्री झाली.

ह्याच अद्भुत स्पर्शशक्तीचा अनुभव जेव्हा श्रीरामकृष्ण शेवटच्या आजारात काशीपूरच्या बगिच्यात राहावयास गेले होते, तेव्हा इतर भक्तांनाही आला. त्या दिवशी १८८६ सालाची जानेवारी महिन्याची पहिली तारीख होती. तो दिवस अत्यंत महत्त्वाचा आहे, कारण त्या दिवशी श्रीरामकृष्णांनी आपल्या भक्तप्रेमाची परमसीमा केली. 'तुम्हाला चैतन्य प्राप्त होवो' असा वर त्यांनी आपल्या भक्तांना दिला व प्रत्येकाच्या शरीराला स्पर्श करून, महत्प्रयासाने प्राप्त होणाऱ्या ईश्वरदर्शनाचा लाभ त्यांना घडवून दिला.

अशा रीतीने स्वत:मधले अध्यात्मतेज नुसत्या स्पर्शाच्या साहाय्याने दुसऱ्यामध्ये प्रगट करण्याची अद्वितीय शक्ती श्रीरामकृष्णांच्या ठिकाणी वसत होती. ह्या शक्तीचा उपयोग त्यांनी धर्मकार्याकरिता केला व दैवी सामर्थ्यवान असा शिष्यवर्ग जमवून सनातन हिंदुधर्माला पूर्वीचे उच्च स्थान मिळवून दिले.

## ६ –अखेरचे दिवस आणि महासमाधी

**अखेरचे दिवस:-** श्रीरामकृष्णांचे भक्तगण त्यांचेकडे सन १८८१ च्या पुढे आले; पुढील चार वर्षे धर्माच्या पुनरुजीवनाच्या दृष्टीने महत्वाची आहेत. ह्याच काळांत त्यांनी आपल्या भक्तांबरोबर अद्भुत लीला

करून सारे कलकत्ता शहर व बंगाल प्रांत हलवून सोडला, व लोकांच्या विचारात प्रचंड क्रांती घडवून आणली. हिंदुस्थानच्या त्या काळच्या परिस्थितीत ह्या क्रांतीचे महत्व अपूर्व आहे; कारण धार्मिक शिथिलतेच्या काळात श्रीरामकृष्णांनी बंगालला व पर्यायाने सर्व हिंदुस्थान देशाला आपल्या सनातन धर्माचे खरे स्वरूप प्रत्यक्ष उदाहरणांनी समजावून दिले, आणि एवढेच नव्हे तर धर्मजागृतीची ही ज्योत त्यांनी स्वामी विवेकानंदादी शिष्यांच्या करवी अद्यापपर्यंतही तेवत ठेवली. ह्या दृष्टीने आपल्या देशाच्या धार्मिक इतिहासात त्यांचे स्थान अत्यंत उच्च आहे.

सन १८८५ साली त्यांच्या गळ्याला चमत्कारिक रोग झाला व तेव्हांपासून ते रुग्णशय्येवरच होते. त्या स्थितीत देखील त्यांनी लोकसंग्रहाचे कार्य उत्साहाने चालू ठेवले. रोगामुळे शरीराला अत्यंत वेदना होत असताही त्यांना वरचेवर समाधी लागे व जिवंतपणाची सर्व चिन्हे अदृश्य होत. डॉ. महेंद्रलाल सरकार सारख्या प्रख्यात डॉक्टरालासुद्धा त्यांची ही स्थिती पाहून आश्चर्य वाटे व त्यांची मती कुंठित होई.

आपल्याला हे जग केव्हा सोडून जावे लागणार हे त्यांना अगोदरच समजले होते. महासमाधीपूर्वी ते कित्येकदा म्हणाले होते की 'लोक मला जाहीर रीतीने ईश्वराचा अवतार मानू लागले म्हणजे मग हे शरीर लवकरच अंतर्धान पावेल.' आणि खरोखरच त्यावेळी अनेक भक्तगण त्यांना ईश्वरस्वरूपाने पूजीत. विशेष लक्षात ठेवण्याजोगी गोष्ट ही की त्यांनी देह विसर्जन करण्यापूर्वी आपल्या भक्तांकरिता प्रेमाची लूट मांडली होती. ''मी जेव्हा जाईन तेव्हा आपले प्रेमाचे भांडे फोडून जाईन!'' हे त्यांचे शब्द त्यांच्या भक्तांविषयीच्या प्रेमाची साक्ष देतात. आणि खरोखरच एक दिवस त्यांनी आपल्या दैवी स्पर्शशक्तीच्या साहाय्याने कित्येकांना चैतन्याचा कसा अनुभव आणून दिला ह्याची हकीकत आपण मागे वाचलीच आहे.

महासमाधीपूर्वीच्या काळरात्री ते आपल्या एका भक्ताला म्हणाले,'' देहाला क्लेश हे व्हावयाचेच. मला स्पष्ट दिसत आहे की हा देह पंचमहाभूतांचा आहे. नंतर ते म्हणाले,''मला अनेक ईश्वरीय रूपे दिसत आहेत, त्यातच हे रूपसुद्धा (स्वत:चे) दिसत आहे!'' पुढे ते म्हणाले, 'मला आता काय दिसते.' सांगू ? तोच (ईश्वर) सर्व काही झाला आहे. सर्व जगत् त्यानेच व्यापले आहे. बली, बली मारण्याचा ठोकळा आणि तो मारणारा हे सर्व तोच झाला आहे !!''

ऑगस्ट महिन्याच्या १३ किंवा १४ तारखेस श्रीरामकृष्णांचे दुखणे फारच वाढले. सर्व मंडळी काळजी करीत बिछान्याभोवती स्तब्धपणे बसली. त्यांचे क्लेश कुणालाही बघवेनात! नरेंद्र त्यांच्या अगदी जवळच बसला होता. श्रीरामकृष्णांचे शारीरिक दु:ख पाहून क्षणभरच त्याच्या मनात त्यांच्या अवतारत्वाबद्दल संशययुक्त विचार येऊन गेला. हा विचार येताक्षणीच श्रीरामकष्णांनी तो अंतर्ज्ञानाने जाणला व त्याच्याकडे टक लावून पाहत ते गंभीर स्वराने म्हणाले, **''अजूनही शंका, अजूनही संशय अं? पक्के लक्षात ठेव की जो राम आणि कृष्ण (झाला होता) तोच आता रामकृष्ण! (होऊन आला आहे!)''** ते शब्द कानी पडताच सर्व मंडळी व विशेषत: नरेंद्र –अगदी चकित होऊन गेला!

दिवसेंदिवस त्यांची प्रकृती अधिकाधिक खंगत चालली. आपला देह आता फार दिवस राहत नाही ह्याची त्यांना जाणीव झाली व म्हणून त्यांनी अखेरची निरवानिरव करण्यास सुरुवात केली. एकान्तामध्ये ते नरेंद्रास बोलावीत व त्याला पुढे काय करावयाचे हे समजावून सांगत. एक दिवस त्याला त्यांनी आपल्या खोलीत बोलावून ध्यानस्थ बसण्यास सांगितले. तो ध्यानस्थ बसला व लवकरच त्याची बाह्य संज्ञा नाहीशी झाली. काही वेळाने ध्यान विसर्जन करून पाहतो तो श्रीरामकृष्णही जवळ बसले असून त्यांच्या नेत्रांतून अश्रू वाहत आहेत!! त्याचेकडे पाहून ते म्हणाले, ''नरेन्, मजजवळ होते नव्हते तेवढे सर्व तुला देऊन, आतामात्र मी खरा खरा फकीर बनलो!'' धर्मप्रचाराच्या कामी उपयोग करण्याकरिता त्यांनी आपली सर्व आध्यात्मिक शक्ती स्वामी विवेकानंदांना अर्पण केली व स्वामी विवेकानंदांनी त्या शक्तीचा योग्य उपयोग करून, सर्व-जगभर वैदिक धर्माचा संदेश कसा पोहोचविला ही हकीकत सुप्रसिद्धच आहे.

अखेर ऑगस्ट (१८८६) महिन्याची १६ वी तारीख आली. त्या रात्री त्यांची मुद्रा पूर्णपणे बदलून गेली होती, व तीवर दुखण्याचे काहीएक चिन्ह दिसत नव्हते. त्यांनी सर्व मंडळींना जवळ बोलाविले व नरेंद्राकडे वळून ते म्हणाले, ''या मुलांची नीट काळजी घे बरे!'' हे शब्द त्यांनी त्या रात्री तीन चार वेळा उच्चारले असतील. नंतर ते निजले. एक वाजण्याच्या सुमारास ते एकदम कुशीवर वळले व ॐॐअसा घोगरा आवाज मंडळीच्या कानी आला. त्यावेळी त्यांचे अंग रोमांचित झाले असून वदनमंडळ अत्यंत शांत व तेजोमय झालेले दिसले. त्यांचा आत्मा सच्चिदानंदात लीन झाला—हीच त्यांची महासमाधी!!

**स्वामी विवेकानंदांचे कार्य व 'रामकृष्ण मिशन' ची स्थापना:-** श्रीरामकृष्णांच्या मागून स्वामी

विवेकानंदांनी सनातन हिंदुधर्माचा  झेंडा जगभर कसा फडकविला ही गोष्ट सर्वांना माहीत आहे. १८९७ साली अमेरिकेहून परत आल्यावर त्यांनी 'रामकृष्ण मिशन' ही संस्था बेलुर (कलकत्त्याजवळ) येथे स्थापन केली.

निरनिराळ्या धर्मांचा सहानुभूतिपूर्वक अभ्यास करून सनातन हिंदुधर्माच्या सार्वत्रिक प्रचारासाठी संन्यासी प्रचारक तयार करणे व मनुष्यमात्रांना प्रत्यक्ष देव समजून त्यांची सेवा करणे हे ह्या संस्थेचे मुख्य उद्देश आहेत. **ही दोनही प्रकारची कार्ये कर्मयोगाचे ध्येय पुढे ठेवूनच केली जातात; आणि म्हणूनच 'रामकृष्ण मिशन' चा अनुयायी, हाती घेतलेल्या कार्यालाच नव्हे तर ज्या स्त्रीपुरुषांशी ते कार्य करताना संबंध येतो, त्यांनासुद्धा साक्षात परमेश्वर समजून आपला त्यागाचा व लोकसेवेचा मार्ग आक्रमीत असतो.** असली श्रद्धा बाळगून केलेले काम, 'लोकसेवा म्हणजेच परमेश्वरसेवा' हे तत्त्व मनावर बिंबवितें आणि मग साहजिकच ह्या मार्गातला साधक अधिकाधिक नि:स्वार्थी बनून अखेरीस 'सर्वांभूती परमेश्वर भरला आहे' ह्या वेदान्तातील उच्च कल्पनेचा प्रत्यक्ष अनुभव घेतो ! हाच खरा त्यागमार्ग आणि हीच खरी लोकसेवा!!

सध्या हिंदुस्थान, इंग्लंड, अमेरिका, आफ्रिका, जर्मनी, ब्रह्मदेश, सिलोन, मलाया द्वीपकल्प वगैर देशांत ह्या मिशनच्या निरनिराळ्या शाखा असून त्यांनी लोकसेवेचे पवित्र व्रत चालविले आहे. वेदान्ताची शिकवणूक देणे, मोफत दवाखाने काढणे, दुष्काळपीडितांना आणि महापुरात निराश्रित झालेल्यांना मदत करणे, शिक्षणसंस्था चालविणे वगैर कामे मिशनकडून करण्यात येतात.

श्रीरामकृष्ण समाधिस्थ झाल्यावर थोड्याच अवधीत त्यांचा संदेश पृथ्वीवर बहुतेक ठिकाणी पसरला. पाश्चात्त्य देशांतील विद्वानांना सुद्धा त्यांच्या शिकवणुकीत श्रद्धा उत्पन्न करणारे नावीन्य आढळते व ते सुद्धा त्यांना अवतार मानून त्यांच्याविषयी आपली पूज्यबुद्धी प्रगट करीतात. त्यांच्या धर्मसहिष्णुतेमुळे व उदात्त उपदेशांमुळेच पाश्चात्त्यांत वेदान्ताची आवड उत्पन्न झाली व ते आरंभी हिंदुधर्माचा अभ्यास करू लागले. खरोखरच त्यांच्या अवतारकार्यामुळे पृथ्वीवर नवीनच धर्मयुग सुरू झाले. त्यांनी लोकांमध्ये नवचैतन्य ओतले व मानवी आयुष्याचे ध्येय कोणते आहे हे जगास दाखवून दिले. सर्व धर्म हे एकाच तत्त्वाकडे पोहचण्याचे निरनिराळे मार्ग आहेत व त्या त्या धर्माच्या अनुयायांनी परधर्मीयांशी बंधुत्वाचे नाते ठेवून परस्परांशी वागावे, ही शिकवण त्यांनी जगाला दिली. श्रीरामकृष्णांच्या जीवनचरित्रात व शिकवणुकीत सध्याचे अनेक वादग्रस्त प्रश्न समर्पक रीतीने सोडविलेले आढळतात. धर्माचे जन्मस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या आपल्या देशातील धर्मग्लानी त्यांनी थांबविली व लोकांना नवा दृष्टिकोन देऊन हिंदुस्थानाबरोबर सगळ्या जगाला कायमचे उपकृत करून ठेवले.

त्यांच्या अवतारकार्याचे हेच रहस्य आहे. थोर पुरुषांचे चरित्र पुरतेपणी समजणे ही अत्यंत कठीण गोष्ट आहे, तरी पण त्यांनी आपल्यासमोर ठेवलेली उच्च ध्येये अंशत: जरी आपणाला प्रत्यक्षात उतरविता आली तर आपल्या जन्माचे सार्थक झाले असे समजण्यास हरकत नाही. श्रीरामकृष्णांच्या ह्या चरित्राने वाचकांच्या मनात त्यांचे विस्तृत चरित्र वाचून त्यांच्या उभ्या जीवनाचे मनन करण्याची, थोडी का होईना, पण इच्छा उत्पन्न झाली तर लेखकाला खचित धन्यता वाटल्यावाचून राहणार नाही.

टीप:- हे चरीत्र कै. न. रा. परांजपे यांनी दोन भागांत लिहिले  असून श्रीमत् स्वामी भास्करेश्वरानंद, श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूर, यांनी ते प्रसिद्ध केले आहे.

**समाप्त**